आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३ ऑक्टोबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- स्वभाषा, मातृभाषा आणि इतर भाषा जगवण्यासाठी प्रयत्न करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- पूरपरिस्थितीच्या पाहणीसाठी केंद्रीय पथक सोलापूरात

- सिंधुदुर्गमध्ये समुद्रात बुडून तिघांचा मृत्यू, चौघांचा शोध सुरू

- विष्णुदास भावे गौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना जाहीर

**आणि**

- वेस्ट इंडिज विरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात आज के. एल. राहुल, ध्रुव जुरेल आणि रविंद्र जडेजा यांची शतकं /भारताकडे २८६ धावांची आघाडी

**<><><><>**

भाषा ही संस्कृती जिवंत ठेवण्याचं माध्यम असून या सांस्कृतिक उत्थानात भाषेचं महत्त्व मोठं असल्यानं स्वभाषा, मातृभाषा आणि इतर भाषा जगवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस आणि अभिजात मराठी भाषा सप्ताहाचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुंबईत झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***होल्ड... भाषा बाईट- देवेंद्र फडनवीस***

सर्वाधिक वाङ्मयकोष हे मराठीत असून देशातल्या एकंदर ग्रंथालयांपैकी २५ टक्के ग्रंथालयं महाराष्ट्रात आहेत, याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला. मराठी माणसानं साहित्याची गोडी, विचारांची आवड जोपासून ती पुढच्या पिढीपर्यंत नेण्याचा प्रयत्न केल्यामुळं मराठी भाषा समृद्ध झाल्याचं ते म्हणाले. मराठीत २००पेक्षा जास्त साहित्य संमेलनं दरवर्षी होतात. सर्व प्रकारच्या विचारांचा समावेश असलेली, विविध व्यासपीठं उपलब्ध करून देणारी ही एकमेव भाषा असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

मराठी ही केवळ भाषा नाही, तर महाराष्ट्राच्या संस्कृतीचा श्वास आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराजांची ही भाषा जागतिक स्तरावर पोहोचवण्याचं काम

महाराष्ट्र शासन करत राहणार, असं प्रतिपादन मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांनी केलं. यावेळी विविध पुस्तकांचं प्रकाशन झालं.

**<><><><>**

तातडीने तक्रार दिल्यास सायबर फसवणुकीतले नुकसान टाळता येऊ शकते. सायबर फसवणूक झाल्याचं लक्षात येताच १९३० किंवा १९४५ या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचं आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. ते आज मुंबईत सायबर जनजागृती महिन्याच्या उद्घाटन सोहळ्यावेळी ते बोलत होते. विविध सायबर गुन्ह्यांमुळे होणारी आर्थिक आणि मानसिक हानी रोखण्यासाठी हे गुन्हे घडूच नयेत यासाठी जनजागृती करणं गरजेचं आहे, असंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री**

सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करण्यासाठी शाळांमध्येही व्यवस्था उभारणं गरज त्यांनी व्यक्त केली. या सोहळ्यात सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखवण्यात आला. तसंच 'सायबर योद्धा' या लहान मुलांसाठीच्या कॉमिक बुकलेटचे प्रकाशन झालं. तसंच, सायबर जनजागृतीसाठी काम करणाऱ्या सायबर योद्ध्यांचा सत्कारही झाला.

**<><><><>**

ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या आणि कॅश ऑन डिलिव्हरीसाठी अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या ई-कॉमर्स संकेतस्थळांवर कठोर कारवाई केली जाईल, असा आश्वासन केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिलं आहे. समाज माध्यमावरच्या एका वापरकर्त्याने ई-कॉमर्स संकेतस्थळं विविध पद्धतीने छुपी शुल्कं आकारतात, याविषयी पोस्ट केली होती. त्यात अन्नपदार्थांचं वितरण करणाऱ्या ॲप्लिकेशनकडून आकारल्या जाणाऱ्या पावसामुळे विलंब झाल्याच्या शुल्काचाही समावेश होता. या विरोधात ग्राहक संरक्षण विभागाला तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याची सविस्तर चौकशीही सुरू झाल्याचं जोशी म्हणाले.

**<><><><>**

आयात-निर्यात व्यवसायातले पारंपरिक कागदी बॉन्ड बंद करून त्याऐवजी 'ई-बॉन्ड' प्रणाली सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. या कामासाठी कागदी स्वरूपातले स्टॅम्प पेपर आजपासून बंद

झाल्याचं त्यांनी सांगितलं. आयात-निर्यात करणाऱ्या व्यावसायिकांना राज्यातल्या सर्व सीमा शुल्क कार्यालयांमधून ई-बॉन्ड सहजपणे उपलब्ध होतील.

सध्या आयात-निर्यात व्यवसायांसाठी दर महिन्याला सुमारे तीन ते चार हजार म्हणजे वर्षाकाठी चाळीस हजारांहून अधिक बॉन्ड स्वीकारले जातात. या सर्व मोठ्या व्यवहारात आता ई-बॉन्डमुळे क्रांती होणार आहे. ही प्रक्रिया प्रथमदर्शनी लहान वाटत असली तरी, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक महत्त्वाचा बदलाचा टप्पा ठरेल, असं ते म्हणाले.

<><><><>

गेल्या काही दिवसात झालेला मुसळधार पाऊस आणि पूर यांमुळे सोलापूर जिल्ह्यात झालेल्या शेतीच्या नुकसानाची पाहणी करायला केंद्रीय कृषी मंत्रालयाचं पथक गेल्या दोन दिवसांपासून दौऱ्यावर आहे. या पथकाने मोहोळ, माढा, करमाळा, कुर्डुवाडी, पंढरपूर, मंगळवेढा या तालुक्यांना भेट देऊन कांद्याच्या नुकसानीची पाहणी केली.

<><><><>

जालना जिल्ह्यातल्या घनसावंगी तालुक्यात पूरामुळे बाधित झालेली कुटुंबं गावी परतताच शासनानं मोफत धान्य वाटपाची मोहीम सुरू केली आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थी कुटुंबांना १० किलो गहू आणि १० किलो तांदूळ मोफत दिला गेला. तालुक्यातल्या १५ गावातल्या १५ रेशन दुकानातून हे धान्य वाटप सुरू आहे. २ हजारांहून अधिक कुटुंबांना सुमारे ४३४ क्विंटल धान्य वितरित करण्यात येणार आल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे.

<><><><>

उद्योगपती अनिल अंबानी यांची कर्ज खाती फसवी म्हणून घोषित करायच्या भारतीय स्टेट बँकेच्या निर्णयाविरोधातली याचिका मुंबई उच्च न्यायालयानं आज फेटाळली. ही घोषणा करताना स्टेट बँकेनं रिझर्व्ह बँकेनं ठरवून दिलेल्या प्रक्रियेचं पालन केल्याचा निर्वाळा न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठानं दिला.

<><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या शिरोडा वेळाघर इथल्या समुद्रात आज आठ पर्यटक बुडाले. आज संध्याकाळी चारच्या सुमाराला ही घटना घडली. यापैकी तिघांचे मृतदेह सापडले आहेत, तर एकाला वाचवण्यात यश आलं आहे. उर्वरित चौघांचा शोध सुरू आहे. यातले

काहीजण कुडाळ आणि बेळगावचे असून पाण्याचा अंदाज न आल्यानं पाण्याचा अंदाज न आल्यामुळे ते बुडाल्याचं वृत्त आहे.

**<><><><>**

सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदीर समितीचा विष्णूदास भावे पुरस्कार ख्यातनाम अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे. २५ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरुप आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><>**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमीत्त नागपुरातील दीक्षाभूमीवर आलेल्या हजारो बौद्ध अनुयायांकडून मोठ्या प्रमाणात पुस्तकांची खरेदी केली जात आहे. गेल्या 3 दिवसात सुमारे 5 कोटी रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली असून सवलतींचा दरात पुस्तके मिळत असल्याने पुस्तके खरेदी करण्यासाठी सर्वच बुक डेपो मध्ये गर्दी दिसत आहे.

**<><><><>**

वेस्ट इंडिजच्या विरूद्धच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी भारतानं पहिल्या डावात २८६ धावांची आघाडी घेतली.

काल पहिल्याच दिवशी वेस्ट इंडीजचा पहिला डाव १६२ धावांत गुंडाळून भारतानं २ बाद १२१ धावा केल्या होत्या. आज पुढचा खेळ सुरू झाल्यावर के. एल. राहुल, ध्रुव जुरेल आणि रविंद्र जडेजा यांनी शतकं झळकावली. राहुलनं १००, ध्रुवनं १२५, तर जडेजानं नाबाद १०४ धावा केल्या. शुभमन गिल अर्ध शतक करून बाद झाला. त्यामुळे दिवसअखेर भारताला ५ बाद ४४८ अशी चांगली धावसंख्या उभारता आली. आजचा खेळ थांबला तेव्हा शतकवीर जडेजाच्या जोडीला वॉशिंग्टन सुंदर नऊ धावांवर खेळत होता.

**<><><><>**

धुळ्यातल्या भगवान बालाजी रथाच्या नगर प्रदक्षिणेला आज सकाळी विधीवत पूजेनंतर ढोल-ताशांच्या गजरात प्रारंभ झाला. हे या रथोत्सवाचं एकशे शेहेचाळीसावं वर्ष आहे. बालाजी भगवान यांच्या दर्शनासाठी आणि रथ ओढण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.

**//<><><><>//**